# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 286/2023 दिनांक : 25.07.2023

## 1)घरफोडी :–

**1)भोकर :–** दिनांक 21.07.2023 चे 14.00 वा ते दिनांक 24.07.2023 चे 10.00 वा. चे दरम्यान, **ग्रामीण रूग्नालय भोकर ता.भोकर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे सहायक अधिक्षक ग्रामीण रूग्नालय भोकर या पदावर असुन त्यानी ग्रामीण रूग्नालय भोकर यांचे कार्यालयात एसी बसविण्याकरीता जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय नांदेड यांचे कडुन एसीचे बॉक्स ग्रामीण रूग्नालय भोकर येथे आले होते ते बॉक्स वैदयकीय अधिक्षक साहेब यांचे कार्यालयत कुलुप लावुन ठेवले होते ते कोणीतरी अज्ञात चोरटयाने आत प्रवेश करून एसीचे एकुण किंमती 1,90,000/–रूपया चे साहित्य चोरुन नेले वगैरे **फिर्यादी संजय नारायण देशमुख, वय 55 वर्षे, व्यवसाय नौकरी सहय्यक अधिक्षक कार्यालय भोकर ता.भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरन 263/2023 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री.दिगाबंर पाटील, मो.क्रं9850550670** हे करीत आहेत.

**2)मुखेड :–** दिनांक 23.07.2023 चे 21.00 ते दिनांक 24.07.2023 चे 05.00 वा. चे दरम्यान, **विठ्ठल रूकमिणर मंदिर वरताळा ता.मुखेड जि. नांदेड येथे,** यातील अज्ञात आरोपीने वरताळा गावातील विठ्ठल रूक्मिीणी मंदिराचे दरवाजाचे कडी कोंडा काढुन आत प्रवेश करून विठ्ठलाचे व रूक्मिीणीचे डोक्या वरील चांदीचे मुकुट व रूक्मिणीचे गळयातील सोन्याचे मनी मंगळसुत्र व दागिणे असा एकूण किंमती 36,000/– रु. चा ऐवज चोरुन नेला आहे. वगैरे **फिर्यादी माधव व्यंकटी आटकळे, वय 55 वर्षे, व्यवसाय मंदिर पुजारी रा.वरताळा ता.मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरन 223/2023 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/राठोड, मो.क्रं 9075991793** हे करीत आहेत.

**3)वजिराबाद :–** दिनांक 21.07.2023 रोजी चे 18.30 ते दि. 24.07.2023 चे 09.15 वा. चे दरम्यान,**जिल्हा न्यायालयाचे पाठीमागे जिल्हा परीषद कन्या शाळा वजिराबाद नांदेड येथे**, यातील फिर्यादी यांनी दिनांक 21.07.2023 रोजी सायंकाळी कार्यालयीन वेळेनंतर ऑफीस बंद करून दिनांक 24.07.2023 राजी सकाळी09.15 वा च्या सुमारास कार्यालय उघडले असता कार्यालयाचे छताचे टीनपत्रा वाकवुन कार्यालयातील भविष्यनिर्वाह निधीचे कामकाज करण्याकारीता ठेवण्यात आलेले संगणक टेबलवर ठेवलेले कोणीतरी अज्ञात चोरटयाने ऑफीसचे दाराचे कुलूप कोंडा तोडुन आत प्रवेश करून एक संगणक किंमती 5000/– रूपये व अधिक्षक साहेब यांच्या कक्षातील एक संगणक किंमती 10,000/– रूपये असे दोन संगणक एकुण किंमती 15,000/–रूपयाचा मुद्येमाल चोरून नेला. वगैरे **फिर्यादी प्रशांत दिग्रसकर, वय 50 वर्षे, व्यवसाय शिक्षणधिकारी जिल्हापरीषद नांदेड रा.जिल्हापरीषद कार्यालय नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरन 298/2023 कलम 454, 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/654 कांबळे, मो.क्रं. 899383256** हे करीत आहेत.

**4)बिलोली :–** दिनांक 23.07.2023 रोजी 09.00 वा ते दिनांक 24.07.2023 चे 01.30 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरी बिलोली ता.बिलोली जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी बाई व तिचे घरातील सर्व नातेवाईक जेवण करून झोपले असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीच्या घराचे भिंतीवरून उतरून घरात प्रवेश करून सासऱ्याच्या दवाखन्याचे विलाज कामी 20,000/– रूपये व चंचित ठेवलेली सोन्याची पोत मनी मंगळसुत्र कॅप्सुल असे दीड तोळयाचे सोने किंमती 35,000 रूपय असा एकूण किंमती 55,000/– रु. चा ऐवज चोरुन नेला आहे. वगैरे **फिर्यादी भारतबाई भिमराव रामटक्के, वय 46 वर्षे, व्यवसाय मजुरी रा.बाजार गल्ली बिलोली ता.बिलोली जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बिलोली** गुरन 129/2023 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2542 सोनकांबळे, मो.क्रं 9822172300** हे करीत आहेत.

## 2)चोरी :–

**हदगाव :–**दिनांक 24.07.2023 चे 11.00 वा ते 11.30 वा चे दरम्यान, **महाराष्ट्र ग्रामीण बॅक शाखा हदगाव ता.हदगाव जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा महाराष्ट्र ग्रामीण बॅक शाखा हदगाव येथे पैसे जमा करण्यासाठी बॅकेत गेले असता त्याचे हातातील नायलॉन पिशवीतील नगदी 50,000 /– रूपये पिशवीला ब्लेड मारून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी दत्तराव सिताराम महाजन, वय 60 वर्षे, व्यवसाय सेवानिवृत्त विस्तारधिकारी रा.पिंपरखेड ता.हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगाव** गुरनं 165/2023 कलम 379, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/35 चिंचोले मो.क्र. 9284056205** हे करीत आहेत.

## 3)गंभीर दुखापत :–

**धर्माबाद** :–दिनांक 23.07.2023 रोजी चे 02.30 वा.ते 02.30 वा चे दरम्यान, **आरोपीच्या घरी व हुतात्मा पानसरे वाचनालय एलबीएस कॉलेज रोड धर्माबाद ता.धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व त्यांची पत्नी नामे रेशमा हे त्यांची मुलगी नेहा हिस भेटण्यासाठी शिक्षक कॉलनी धर्माबाद येथे तिचे घरी गेल्या नंतर फिर्यादीचा जावाई नामे शुभम सुदर्शन धांदु यांने फिर्यादीस तुम्ही आमचे घरी कसे काय आले असे विचारले असता फिर्यादी म्हणाला तुम्ही आमची मुलगी नेहा हीस त्रास देत आहोत म्हणुन भेटण्यासाठी आलो आहोत असे म्हणाल्याने जावई शुभम यांने फिर्यादीस उलटे सुलटे बोलुन शिवीगाळ करून फिर्यादी व त्यांचे पत्नीला थापडाबुक्कयांनी मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी दिली त्यावेळेस फिर्यादी व त्यांची पत्नी नामे रेशमा राजु चव्हाण व मुलगी नेहा असे घरातुन निघुन एलबीएस कॉलेज ते पानसरे चौक धर्माबाद या रोडने येत असतांना हुतात्मा पानसरे स्मारक वाचनालयाच्या समोर रोडवर असतांना दुपारी 02.30 वा शुभम हा मोटर सायकल वर येऊन फिर्यादीची मोटार सायकल थांबवुन फिर्यादीचे डाव्या हाताचे दंडावर व खांदयावर तसेच उजव्या हाताचे कोपऱ्याचे समोर पोटरीवर चाकुने वार करून गंभीर दुखापत केली वगैरे **फिर्यादी राजु दलगीर चव्हाण, वय 42 वर्षे, व्यवसाय मजुरी रा.महिकर जि.बुलढाणा** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरन 176/2023 कलम 326, 323, 504,506, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/कारामुगे, मो. नं.9830330790** हे करीत आहेत.

## 4)जुगार :–

**1)नांदेड ग्रामीण** :– दिनांक 24.07.2023 रोजी 13.15 वा. चे सुमारास, **ढवळे मामाच्या पत्राचे टिनशेड च्या पाठीमागील बाजुस रिमाम्या जागेत दुधडेरी समोर नांदेड येथे,** यातील नमुद सात आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या टाईम बाजार नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 39,280/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री गोविंद बालाजीराव जाधव, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 542/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास** पोहेकॉ/**173 माने, मो.क्रं. 9637355836** हे करीत आहेत.

**2)अर्धापुर** :– दिनांक 24.07.2023 रोजी 13.30 वा. चे सुमारास, **मालेगाव ते वसमत जाणारे रोडचे बाजुस पुलाजवळ ता.अर्धापुर जि.नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या श्रीदेवी नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 2180/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/गंगाधर विठ्ठलराव कदम, ने. पोस्टे स्थागुशा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 247/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास** पोहेकॉ/**1279 चव्हाण, मो.क्रं. 9356283717** हे करीत आहेत.

## 5)प्रोव्हिबीशन :–

**मरखेल** :– दिनांक 24.07.2023 रोजी 16.30 वा. चे सुमारास, **आरोपीच्या घरासमोर अंगणात लिंबाच्या झाडाखाली मौ.झरी ता. देगलुर. जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्राा किंमती 3360/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2505 प्रभाकर संभाजी कदम ने. पोस्टे मरखेल** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मरखेल** गुरनं 153/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास** नापोकॉ/**338 वाघमारे, मो.नं. 9552514590** हे करीत आहेत.

## 6)गळफास घेवुन शेतकरी आत्महत्या :–

**नायगाव** :–दिनांक 24.07.2023 रोजी चे सायंकाळी 17.00 सुमारास **केदारवडगाव ता.नायगाव जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे जयसिंग परशुराम जाधव, वय 45 वर्षे, व्यवसाय शेती रा.केदारवडगाव ता. नायगांव जि. नांदेड**, यानी शेतातील सततचे नापीकीस कंटाळुन शेतातील लिंबाचे झाडाला गळफास घेवुन आत्महत्या केला. वगैरे **खबर देणार जळबा एकनाथ जाधव, वय 60 वर्षे, व्यवसाय शेती रा.केदारवडगाव ता. नायगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे नायगाव** आ. मृ. 13/2023 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री.बाचावार, मो.नं. 9637320355** हे करीत आहेत.

## 8)विद्युत शॉक लागुन मृत्यु :–

**मुखेड** :–दिनांक 22.07.2023 रोजी चे 19.36 वा. चे सुमारास, **विजय पाम्पंटवार यांचे दुकानासमोर ता.मुखेड जि.नांदेड येथे,** यातील **मयत नामे ईश्वर ज्ञानोबा डावखरे, वय 35 वर्षे, व्यवसाय शेती रा.वरतळा ता.मुखेड जि. नांदेड**, यातील खबर देणार व त्यांचा भाऊ ईश्वर हे त्यांचे पिकअप गाडीमध्ये पत्रे व फरशी भरून पाऊस येत असल्याने गाडीवर ताडपत्री बांधत असतांना गाडीचे वरून जाणारे मेन लाईनचे तारेला ईश्वर याचा हात लागल्याने गाडीवर पडुन मयत झाला. वगैरे **खबर देणार भगवान ज्ञानोबा डावकरे, वय 37 वर्षे, व्यवसाय शेती रा.वरतळा ता.मुखेड जि. नांदेड,** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे मुखेड** आ. मृ. 35/2023 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास** **पोउपनि**/जाधव, **मो.नं. 9765860359** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड